नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०२/२०२५ (मंगळवार) दुपार**

## नागपुर ग्रामीण जिल्हयात महाशिवरात्री यात्रोत्सव निमित्य लावण्यात आलेला बंदोबस्त

## मा.पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांची श्री चैतन्येश्वर देवस्थान अंभोरा येथे भेट ,महाशिवरात्री बंदोबस्ताबाबत दिल्या सुचना

दिनांक २६/०२/२०२५ रोजी महाशिवरात्री सणोत्सव असुन नागपुर ग्रामीण जिल्हयात एकुण १३१ शिवमंदीर असुन ६० ठिकाणी यात्रोत्सव असते. **सदर उत्सवा दरम्यान श्री चैतन्येश्वर देवस्थान ,अंभोरा येथे यात्र भरते .** यात्रेत भाविकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. २ लाख ते ३ लाख भाविक यात्रेला येतील असा अंदाज आहे. या दरम्यान सदर ठिकाणी कोणताही कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होवुन नये याकरीता पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला असुन **आज दिनांक २५/०२/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी चैतन्येश्वर देवस्थान, अंभोरा येथे भेट दिली.** सदर भेटी दरम्यान मा. पोलीस अधिक्षक यांनी संपुर्ण देवस्थान परीसराची पाहणी करून , गंगाआरती स्टेज ची पाहणी केली. मंदीराच्या वरील बाजुला वैदयकीय चमु तसेच स्ट्रेचर ठेवण्याबाबत सुचना दिल्या. नदी पत्रात कोणीही उतरू नये यासाठी सुचना फलक लावावे आणि नदीपात्राजवळ सुरक्षा रक्षक आणि बोट ची व्यवस्था करणे बाबत सुचना दिल्या. दुचाकी आणि चारचाकी गाडयाची स्वतंत्र पार्कींग व्यवस्था तसेच रत्यावर ट्रॅफिक जाम होणार नाही यासाठी पेट्रोलींग बाबत आणि गरज पडल्यास ट्रॅफिक वळविण्याबाबत सुचना दिल्या. देवस्थान मंडळाचे पदाधिकारी यांच्या सोबत चर्चा करून उपाययोजनांबाबत माहीती घेतली. सदर वेळी श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी ,उमरेड विभाग, श्री प्रमोद घोंगे, पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा, श्री वैभव जाधव ,पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतुक शाखा आणि वेतलुर पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक

श्री प्रशांत मिसाळे असे हजर होते. सदर ठिकाणी १ उपविभागिय पोलीस अधिकारी , २ पोनि, ८ सपोनि/पोउपनि , ५१ पोलीस अंमलदार, १३ वाहतुक पोलीस अंमलदार आणि ८५गृहरक्षक असा बंदोबस्त लावण्यात आला आहे. सदर ठिकाणी १ उपविभागिय पोलीस अधिकारी , २ पोनि, ८ सपोनि/पोउपनि , ५१ पोलीस अंमलदार, १३ वाहतुक पोलीस अंमलदार आणि ८५गृहरक्षक असा बंदोबस्त लावण्यात आला आहे.

**यापुर्वी दिनांक १३/०२/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी रामटेक येथील नागार्जुन टेकडी ,पारशिवणी पोलीस स्टेशन अंतर्गत कुवारा भिवसेन ,घोघरा महादेव या ठिकाणी भेट देवुन महाशिवरात्री बंदोबस्ता बाबत पाहणी केली होती. रामटेक येथे नागार्जुन टेकडी येथे महाशिवरात्री निमित्य यात्रोत्सव असुन भाविकांची मोठी गर्दी असते.** त्याकरीता १ उपविभागिय पोलीस अधिकारी ,१२ सपोनि/पोउपनि , ८० पोलीस अंमलदार, ११ वाहतुक पोलीस अंमलदार आणि ५५ गृहरक्षक असा बंदोबस्त लावण्यात आला आहे. **आज रोजी पोलीस रामटेक येथे बंदोबस्त कामी हजर आलेल्या सर्व अधिकारी आणि अंमलदार यांना श्री रमेश बरकते , उपविभागिय पोलीस अधिकारी ,रामटेक यांनी नागार्जुन टेकडी बंदोबस्ताबाबत सविस्तर मार्गदर्शन करून सुचना दिल्या आणि पोलीस स्टेशन रामटेक ते शास्त्री चौक मार्गे आंबेडकर पुतळा ते पोलीस स्टेशन रामटेक असा रूट मार्च घेण्यात आला.**

**पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत कुवारा भिवसेन , घोघरा महादेव ,शिवटेकडी मंदीर, कान्हा देवी टेकडी आणि कालभैरव मंदीर, पेठ येथे सुध्दा महाशिवरात्री निमित्य यात्रोत्सवाला भाविकांची गर्दी मोठया प्रमाण गर्दी होत असते त्याकरीता** १ उपविभागिय पोलीस अधिकारी , ४ पोलीस अधिकारी , ४३ पोलीस अंमलदार, १० वाहतुक पोलीस अंमलदार आणि ४३ गृहरक्षक असा बंदोबस्त लावण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत श्री कामठेश्वर शिवमंदीर देवस्थान येथे यात्रोत्सवाला भाविकांची मोठया प्रमाणत गर्दी होत असते** त्याकरीता १ उपविभागिय पोलीस अधिकारी , ७ सपोनि/पोउपनि , ४१ पोलीस अंमलदार, ९ वाहतुक पोलीस अंमलदार आणि ६०गृहरक्षक असा बंदोबस्त लावण्यात आला आहे. **नागपुर ग्रामीण जिल्हयात सर्व शिवमंदीर येथे योग्य तो बंदोबस्त नेमण्यात आलेला असुन ६ उपविभागात ६ विभागीय पेट्रोलींग पथक नेमण्यात आलेले आहे.** मा. श्री. हर्ष ए. पोद्दार

,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा **यांनी सर्वांना सर्तकतेने बंदोबस्त करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.**














पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर